नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०४/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

## घरफोडी व मोटरसायकल चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक ०७/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलिस ठाणे बुट्टीबोरी अप. क्र. २५५/२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वि. गुन्ह्याचे समांतर तपास संबंधाने नागपुर शहर परिसरात फिरत असतांना गोपनीय माहिती मिळाली कि, घरफोडी करणारे इसम हे नागपुर शहर परिसरात राहणारे असुन त्यांनी नागपुर शहर व नागपुर ग्रामीण परिसरात बरेच ठिकाणी घरफोड्या व मोटारसायकली चोरी केलेल्या आहेत व ते इसम लाल रंगाचे कार क्र. MH-01/AH-7417 ने नागपूर ते बुट्टीबोरी रोडने फिरत आहेत अशा गोपनीय माहिती वरुन सापळा रचुन वरील क्रमांकाचे वाहनास थांबविले असता त्यातील इसम पळू लागले पाठलाग केला असता आरोपी नामे– १) मोनु रायडर उर्फ प्रशिल संजय जाधव, वय २३ वर्ष, रा. वसंत नगर, अजनी, नागपुर २) घवल उर्फ रोशन विजय मुन, वय १९ वर्ष, रा. जोशी वाडी, अजनी, नागपुर हे मिळून आले व ३) पाहिजे आरोपी नामे आदित्य मेश्राम, रा. किरणापुर, नागपुर हा पळून गेला. यातील दोन्ही आरोपीस ताब्यात घेवुन आरोपिंना विश्वासात घेऊन गुन्ह्या बाबत सविस्तर विचारपूस केली असता त्यांनी आपले साथीदारां सोबत मिळून गुन्हा केल्याचे सांगितले. आरोपींकडुन गुन्हयात चोरी केलेले मुद्देमाल जप्त करून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आणले. उघडकीस आणलेले गुन्हे १) नागपूर ग्रामीण जिल्हा पो स्टे बुट्टीबोरी अप. क्र. २५५/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वि. २) पोस्टे बुट्टीबोरी अप. क्र. २८३/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वि. ३) नागपूर शहर पोस्टे सक्करदरा अप. क्र ११२/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा. द. वी ४) पोस्टे हुडकेश्वर अप. क्र. १८६/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भा. द.वी ५) पो स्टे कळमना अप. क्र. २४९/२४ कलम ३७९ भा. द. वि. असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणले. आरोपीतांकडुन १) लाल रंगाची मारूती SX4 कार क्र. MH-01/AH-7417 की. १,५०,०००/– रू. २) काळया रंगाची बजाज पल्सर २२० मो.सा. क्र. MH -49/S-9812 की ९०,०००/– रु. ३) काळया रंगाची बजाज पल्सर 160NS मो.सा. क्र. MH - 40/CP-099 की ९०,०००/–रु. ४) ४ मोबाईल संच किंमती ४०,०००/–रू. ५) एक लोखंडी कटोनी किंमती १००/– रू. असा एकूण ३,७०,१००/– रु. चा मुद्देमाल जप्त करून दोन्ही आरोपिंची वैद्यकीय तपासणी करून कागदपत्र व जप्त मुद्देमालासह गुन्ह्याचे पुढील अन्वेषण कामी पोलीस स्टेशन बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार साहेब (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ साहेब अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्था.गु.शा. सपोनि आशिष सिंग ठाकूर, पोउपनि आशिष मोरखडे, सफौ महेश जाधव, पोहवा मिलिंद नांदुरकर, अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, मयूर ढेकळे, रोहन डाखोरे, मपोहवा कविता बचले, पोना अमृत किनगे, चालक अमोल कुथे, आशुतोष लांजेवार तसेच सायबर सेलचे सतिष राठोड यांनी पार पाडली.




( स्थळ ब्रुक बॉन्ड मैदान कन्हान शहर येथे मा. श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार यांचे प्रचार सभेच्या संदर्भाने जड वाहनांच्या रहदारीचे नियमनाबाबत )

नागपुर ग्रामिण घटकातील पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत लोकसभा निवडणुक –२०२४ संदर्भाने रामटेक लोकसभा निर्वाचन प्रचारार्थ स्थळ ब्रुक बॉन्ड मैदान कन्हान शहर येथे दि. १०/०४/२०२४ रोजी वेळ १५.०० वा. मा. श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार यांचे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सभेकरिता रामटेक लोकसभा मतदार संघातील असंख्य कार्यकर्ते व लोकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. मनसर ते कन्हान मार्गे नागपूर शहरकडे जाणारा रस्ता हा कन्हान शहरातून जात असल्याने जाणाऱ्या येणाऱ्या जड, अवजड व इतर वाहनांची संख्या जास्त प्रमाणात आहे. सदर कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेले स्थळ हे कन्हान शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत असल्याने वाहतूकीची कोंडी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. करीता वरील परिस्थिती टाळण्यासाठी दि. १०/०४/२०२४ चे दुपारी १२.०० वा. पासुन ते दि. १०/०४/२०२४ चे २१.०० वाजता पर्यंत सर्व प्रकारचे जड, अवजड व इतर वाहनांना मनसर ते कन्हान मार्गे नागपूर शहरकडे जाण्यास प्रवेश देणे सर्वसाधारण जनतेच्या जिवीतास धोकादायक आहे.

तरी सभास्थळ बुक बॉन्ड मैदान कन्हान शहर येथील मा. श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार यांचे प्रचार सभेनिमित्त राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ मनसर ते कन्हान मार्गे नागपूर शहर हद्दीपर्यंत दिनांक १०/०४/२०२४ चे दुपारी

१२.०० वा. पासुन ते दि. १०/०४/२०२४ चे २१.०० वाजता पर्यंत सर्व प्रकारच्या जड, अवजड व इतर वाहन वाहतुकी करिता बंद करण्यात येत आहे. तसेच पर्यायी व्यवस्था म्हणुन खालील मार्ग वाहनांच्या वाहतुकीकरिता उपलब्ध आहेत.

१) नागपूर वरून जाणाऱ्या वाहनाकरीता मार्ग आशा हॉस्पीटल –कामठी–भानेगाव(खापरखेडा)–पारशिवनी आमडी फाटा– मनसर या पर्यायी मार्गाने रामटेक तुमसर करीता वळविण्यात येत आहे.

२) राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ मनसर ते कन्हान मार्गे नागपूर शहरकडे जाणारी वाहतुक आमडी फाटा–पारशिवनी–भानेगाव –(खापरखेडा) –दहेगाव रंगारी –कोराडी–नागपूर शहर हददीपर्यंत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर